Volume-1, Issue-1, February 2018

# ANEKANT

Journal of Humanities and Social Sciences

# ग्रामीण-कृषी जीवनाचा वास्तव वेध घेणारी कल्पना दुधाळ यांची कविता


**सीमा नाईक-गोसावी**

सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती ४१३१०२, जि.पुणे
ई-मेल : seemanaik69@gmail.com


---


**सारांश :**

कल्पना दुधाळ या समकालीन महत्त्वाच्या कवयित्री. बहिणाबाई चौधरीनंतर कृषी आणि ग्रामजीवनाची संवेदना मौलिकरित्या रेखाटणारी ताकदीची कवयित्री. 'आपला भोवतालचा आवाजच असते कविता' असं म्हणणाऱ्या कल्पना दुधाळ ग्रामीण पर्यावरणाचा वेध घेतात. त्यांची कविता ग्रामीण जीवनाचे यथार्थ व वास्तव दर्शन घडवते. कल्पना दुधाळांची कविता एका अनुभवाधिष्ठित कष्टकरी ग्रामीण स्त्रीची कविता आहे. कृषीजीवन हा मूलाधार असलेली ही कविता अनुभवातील सच्चेपणा व मूल्यभान असलेले आशयसूत्र यामुळे आपल्या मनात ठसते. कवितेची भाषाशैली साधी, सोपी असून जागतिकीकरणाचा ग्रामजीवन व शहरी जीवनावर, कुटूंब व अर्थव्यवस्थेवर होणारा दुष्परिणाम त्या अधोरेखित करतात. शेतीमातीशी इमान राखणारी ही कवयित्री बळीराजाची बहुस्तरीय कहाणी मांडते आणि हाच त्यांच्या कवितेचा अंतःस्वर व आत्मोद्गार आहे.


कल्पना दुधाळ हे समकालीन कवितेतील एक महत्त्वाचे नाव. 'सिझर कर म्हणतेय माती' (२०१०) आणि 'धग असतेच आसपास' (२०१६) हे त्यांचे दोन काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. 'सिझर कर म्हणतेय माती' हा काव्यसंग्रह कवयित्रीने मातीत आणि मातीसाठी राबणाऱ्या हातांना' .... अर्पण केला आहे. तर या संग्रहाला एकूण १**8** पुरस्कारांनी सन्मानित केले गेले आहे.

‘धग असतेच आसपास’ हा संग्रह त्यांनी ‘कवितेला जीव लावणाऱ्या सर्वांना’ अर्पण केला आहे. मातीशी नातं सांगणारी अशी ही कविता कृषी आणि ग्रामजीवनाचा वेध घेणारी आहे. मातीत घटट् पाय रोवून उभी राहणारी ही कवयित्री शेती, निसर्ग, माती, पशू-पक्षी, प्राणी, शेतात राबणारी माणसं, पीकपाणी अशा ग्रामीण आणि कृषी पर्यावरणातील असंख्य घटकांना घेऊन आपल्या कवितेत अवतरते या सर्व घटकांमुळेच आपण काही ना काही विचार करू शकतो, त्यांच्यामुळेच आपल्याला प्रेरणा मिळते असे त्या म्हणतात.

‘सिझर कर म्हणतेय माती’ या काव्यसंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत ‘वर्तमान कृषीजीवनाचा एक अस्वस्थ उद्गार!’ अशा शब्दात डॉ.देवानंद सोनटक्के यांनी या कवितेचा गौरव केला आहे. प्रस्तावनेत ते म्हणतात, ‘‘कवयित्री नुसत्या समस्या वेदना, विदारकता सांगत नाहीत तर त्यावर कवयित्री आपल्या परीने उपायही सांगते हताश न होता नव्या क्रांतीची अपेक्षाही करते. ही कविता आजकालच्या बहुतांश कवितांसारखी भावना विव्हळ आणि रडकी नाही. ती स्थितीगतीवर थेट आणि तरीही इन्टेलेक्चुअल भाष्य ठरते.

चांगली कविता निव्वळ वाचण्यासाठी नसते. ती वाचकाला वर्तमानाचे अचूक भान देते. कारण चांगली कविता पिचलेल्या सामान्य माणसाचा व्यवस्थेविरूध्दचा उद्गारही असतो आणि एल्गारही! कसदार कविता लिहिणाऱ्या आजच्या मोजक्या कवींमधील कल्पना दुधाळ हया एक कवयित्री आहेत.’’[१]

कल्पना दुधाळ यांची कविता जागतिकीकरणाचा गावपातळीवर होणारा जोरदार आघात नेमकेपणाने टिपणारी कविता आहे. शेतकरी, शेतीतील मालाला न मिळणारा भाव, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, त्यामागील कारणपरंपरा, बदलते ग्रामजीवन, तुटत चाललेले नातेसंबंध, शेतीचा खालावत जाणारा दर्जा या सर्व गोष्टी त्यांच्या कवितेत येतात.

'कणसांचे मरणोत्सव' या कवितेत कवयित्री सध्याच्या काळातील कृत्रिम हुरडापाटर्यांवर बोट ठेवते व नैसर्गिकतेतील आनंद मिळत नसल्याची खंतही व्यक्त करते.

'परदेशातल्या टयुलीप्स फुललेल्या
देखण्या शेतांचा हेवा वाटला होता कधीकाळी
आता मात्र माझ्या उजाड रानातल्या
कणसांचाच मोह पडलाय
इवलं मूठभर टचटचीत दाण्यांच कणीस
तेच आपला जगण्याचा आधार
आणि तेच आपलं टयुलीप...
पण गोफण, हुरडा, साखर, टयुलीप....
... काहीच सापडत नाही
धान्यापासून मद्यार्कनिर्मितीची चर्चा
घुमत राहते... रानभर ... मनभर
अनुदानाच्या उसन्या सावलीत
ग्लोबल एरिया नेटवर्कमध्ये
मी मात्र कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर'[२]

अशा रीतीने मातीवर व पिकांवर केले जाणारे नवनवीन प्रयोग या विचारांमुळे कवयित्री अस्वस्थ होते. ही अस्वस्थताच कवयित्रीला कविता लिहिण्यासाठी प्रेरणा ठरलेली आहे. माती ही सृजनाची व निर्मितीप्रक्रियेची प्रेरकता आहे. माती तिचे नैसिर्गिकपण हरवून बसेल याविषयीची चिंता कवयित्रीला आहे.

कल्पना दुधाळ कवितेविषयी एके ठिकाणी म्हणतात,

'मिटू तरी कसे, कसे खोलू रूखे ओले
असे दोन्ही डोळे, कुठे बोलू मनातले'[३]

'माझ्या अस्वस्थ आयुष्यात कविता भेटली नसती तर मी चिडकं-रडकं आयुष्य जगले असते. माझ्यासाठी माझी कविता अत्यंत जिव्हाळयाची गोष्ट आहे' असेही त्या म्हणतात.

'सहजता' हा कल्पना दुधाळ यांच्या कवितेचा आत्मस्वर वाटतो उत्कटता व उत्स्फूर्ततेने त्या अनुभवाकडे पाहतात 'सिझर कर म्हणतेय माती' या काव्यसंग्रहाच्या प्रारंभीच त्यांनी काव्य निर्मितीसंबंधी म्हटले आहे की,

'मातीतून चालता मी, मातीच होऊनी जाते
गर्भात हिरवे कोंब, खुशाल उगवू देते'[४]

अशी त्यांची कविता जात्यातून सहजतेने पडणाऱ्या पीठासारखी सहजतेनेच पोटातून ओठात येणाऱ्या बहिणाबाई चौधरींच्या कवितेची आठवण करून देते.

कल्पना दुधाळ यांच्या कवितेत ग्रामीण जीवनाचे त्यातील निरागसतेचे, सामाजिक विषमतेचे तर चित्रण आहेच परंतु ग्रामीण वास्तव ज्या ताकदीने रेखाटलेले आहे ते लक्ष वेधून घेते. ग्रामीण वास्तवात वावरणाऱ्या स्त्रीचे चित्रण त्यांनी वेगळया संवेदनशीलतेने टिपले आहे.

कवितेत शेतीमातीतली अनेक धडपडणारी माणसं भेटतात. मातीवर श्रध्दा, कमाल गढून जाणारी ही माणसं टोमॅटोवर काळे डाग पडू नये म्हणून रासायनिक खतांचा वापर, औषधांचा मारा करतात हे कवयित्रीला अस्वस्थ करतं. कल्पना दुधाळ म्हणतात, ''माझ्याभोवती जे आहे, जसं आहे, तसं लिहीत गेले. त्यात उसनेपणा आणला नाही की दिखाऊपणा मिसळला नाही. त्या साध्या सरळ कविता आहेत.''[5]

बदललेला ग्रामीण परिसर, पोशाख, परिवर्तनाच्या प्रक्रियेला सामोरे जाणारे ग्रामीण वातावरण - पर्यावरण त्यांच्या कवितेचा एक भाग बनते. नव्या युगांचे ठसे सहजपणे त्यांची कविता उमटवते. तशी भाषाही त्यांना सुचते त्या एका कवितेत लिहितात -

''मी टाकलेली मेथी आणि कोथिंबीर
मागतेय माझ्याकडे,

युरियाचा खाऊ आणि लुसलुशीत व्हायचं स्प्रेअर
रखरखीत झाडाच्या सालीनं,
मॉश्चरायझरचा हटट् धरलाय
आणि माती अडून बसलीय, सीझर कर म्हणत मी काय करू?" [६]

व्हेज-नॉनव्हेज, अनेक इंग्रजी शब्दांचा सहजपणे त्या वापर करतात. जसे रेस्टॉरंट, स्प्रेअर, मॉइश्चरायझर, ट्रे, सिझर, युरिया, सीड, क्रीम, ट्रॅक्टर, शॅम्पू, बॅलन्स, बॅटरी संपलेला मोबाईल इ. अनेक शब्द कवितांमध्ये चपखल बसतात.

बॅलन्स आणि बॅटरी संपलेल्या मोबाईसारखी बिनकामाची माणसं, मजुरांविना अर्धांगवायू झालेल्या शेतीला उभं करताना नव्या वाटा शोधणारी माणसं, अशी रूपं त्यांच्या नजरेतून सुटत नाहीत.

रासायनिक खतं, विद्राव्य खतं
बुरशीनाशकं तणनाशकं
ठिबकसिंचन कृषी-पर्यटन ट्रॅक्टर
मळणी कापणी यंत्र ऑटोस्वीच
बचतगट, कृषी कॉल सेंटर हेल्पलाईन
कित्येक जोडधंदे, कित्येक नवे प्रयोग" [७]

"शेतकरी राजा अस सारं जग हाताशी आलं तरी जगण्याची लढाई ज्याची त्यालाच लढावी लागते. नव्या युगाला मातीचं ग्लोबल वर्ल्ड दाखवून दे" असं कवयित्री सुचविते.

बदलती ग्रामीण संस्कृती व बदलत जाणारी नाती, दुरावलेली माणसे यांविषयीच्या अनेक कविता कल्पना दुधाळ यांनी लिहिल्या आहेत. उदा. सायेब, खोंड, कपिला, भेडं दाणं, झलक, आईच्या पदराखालून इ. कविता यादृष्टीने उल्लेखनीय आहेत. 'मृदगंध' या कवितेत कवयित्री लिहिते -

"हरितक्रांतीच्या स्वप्नांनी

मातीतल्या माणसांना फुलवलं
फळ भाज्या पिकांना हंगाम डावलून
बारमाही केलं''
किंवा
''उगवलेल्या गवतापासून फिरलेल्या आभाळापर्यंत
वळलेल्या काठमुऱ्यापासून मुसकी आणि बाजंच्या काथ्यापर्यंत
नक्षत्रांच्या वैशिष्टयांपासून पाखरांच्या विष्ठेपर्यंत
सारं ठावं होत मागच्या पिढयांना
पण त्या माहितीचं ''नॉलेज'' कधीच झालं नव्हतं.
आता कृषी शिक्षणाच्या डिजिटल धडयात
मृद्गंध शोधतो आम्ही''[8]

कवयित्रीचे गावाशी आणि गावातल्या माणसांच्या भावभावनांशी अतूट नाते आहे. 'धरणातलं पाणी आटल्यावर' या कवितेतून पुनर्वसनाच्या चिंधडया सांभाळणारे गाव, विकासाच्या योजना नोटीशी, पाणलोटात गेलेली जमीन अन् त्या संपूर्ण गावाचा लेखाजोखा कवयित्री कवितेतून मांडते तेव्हा उपरोधिकता आणि वास्तवता नेमका अर्थबोध होतो.

'वाटण्या' कवितेत

''शेताच्या वाटण्या झाल्या
विहीरीवर पाळया बसल्या
आईबाप वाटून घेतले
बहिर्णींनी दावे लावले''

''पिढीजात ताटल्या विकून
बाटल्या जवळ केल्या
सातबाराच्या गुंडाळया करून

सिगारेटही ओढल्या''

''बाजाराच्या पिशवीत आता

कुरकुरेचा फॅमिली पॅक

पोरागणिक कॅडबरी

आणि काळया पिशवीत छटाक!''[9]

असे म्हणत घरापुरत्या सुध्दा जमीनी नावावर न राहिल्याची खंत कवयित्री व्यक्त करते. मातीतल्या माणसाच्या माणूसपणालाच भिरूड लागून ते नष्ट होताना जग मुठीत घेऊन. एक्सप्रेस युवरसेल्फ कनेक्टिंग पिपल म्हणायचं? असा प्रश्न कवयित्री विचारतात. या प्रश्नांची उत्तरे अनेक आहेत. प्रश्न अंतर्मुख करतात.

शेतकऱ्यांची दयनीय अवस्था, काबाडकष्ट, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतात शिवारात रमणारे मन, येणारे बिकट प्रसंग, समाजव्यवस्थेने आणि शासनाने शेतकऱ्यांविषयी अनास्था दाखविणे या सर्व गोष्टी बाराकाव्यानिशी कवयित्री टिपते. 'धग असतेच आसपास' 'या काव्यसंग्रहातील कवितांनी मला खूपदा रडविले आहे' असे त्या एके ठिकाणी म्हणतात. 'धग असतेच आसपास' या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र फौंडेशनचा ललितग्रंथ पुरस्कार (२०१७) लाभला आहे. मनातली 'घालमेल' त्यांनी अशी टिपली आहे पहा -

''इथं स्वतःला

डोंगरासारखं फोडावं लागतं

तापलेल्या भट्टीसारखा ताव यावा लागतो

घालमेलीचा उफळा

आतल्या आत थोपवून

शांततेची भयंकर शपथ घ्यावी लागते

मेल्यासारखी झापडं लागू न देता

श्वासाश्वासाला खरेपणाचा

जाब विचारावा लागतो

संसाराच्या वटारलेल्या डोळयात

कवितेच्या ओळीचं काजळ फासावं लागतं

तेव्हा कुठं

अनुभवाची प्रामाणिक सांगड

शब्दात सापडते''[१०]

अशी स्वानुभवाविषयी कवयित्री बोलते त्यावेळी तिची घालमेल ही घालमेल नसते तर अख्खा समकालच आतडयांना गुंडाळलेली ती केविलवाणी उलथापालथ असते जीवाची! ती कवितेचे कवितापण जपते. तसेच मूल्यभानातून कवयित्री विचार व्यक्त करते. सूचक टिपण्णी करत आशावादी सूर लावते तो ठळक जाणवतो.

'धग असतेच आसपास' या कवितेत कवयित्री लिहिते -

''लाख बदललं जग पण भूमीशी बांधलेलं आयुष्य

समूळ तोडता येत नाही.''[११]

वस्तूंसारखी माणसं बदलता येत नाही,

टाळताही येत नाही, दरवेळी भाजतेच असं नाही,

धग असतेच आसपास''[११]

कल्पना दुधाळांची कविता एका अनुभवाधिष्ठित कष्टकरी ग्रामीण स्त्रीची कविता आहे. कृषीजीवन हा मूलाधार असलेली ही कविता अनुभवातल्या सच्चेपणामुळे आपल्या मनात ठसते. उस्फूर्तता व उत्कटता हा या कवितेचा स्थायी भाव आहे. एका संवेदनशील स्त्रीमनातून या कवितेला वाट सापडते. ही एका बाईच्या नजरेतून अनुभवाकडे बघणारी व नितळ अनुभवाला कवटाळून आविष्काराची नवलाई पुन्हा शांत व तटस्थपणे मांडणारी - निर्मितीला स्थिरतेने न्याहाळणारी ही कवयित्री आहे. कुठेही तोल सुटू न देता नेमकेपणाने कृषी - ग्रामजीवनाचा वास्तव वेध घेणारी ही कविता

समकालीन परिस्थितीवर मार्मिक भाष्य करते. परिवर्तनाची आस संयतपणे मांडते कवितेतून. त्यांच्या काही कविता लोकगीतांच्या लयीच्या भासतात.

जसे - (गणगोत) कविता

''किती खुरपू बाई गं
सारी गवतें गवतं
कसं उपटून फेकू
मातीचंच गणगोत''

''मूठभर राख माझी
मातीमधी मिसळावी
गणगोत होऊनिया
पुन्हा गवतं उगावी''[१२]

कवितांमधून कवयित्रीच्या अनुभवातील सच्चेपणा लक्षात येतो. उदा. 'कार्यशाळेत' या कवितेतील बंदिस्त शेतीपालन, कुंडीतला भाजीपाला व्यवस्थापन, सांडपाण्यावरचं कीचन गार्डन, मातीविना शेतीचे प्रयोग, पॅकिंग ज्यूस, जॅम, गोठयात राबणारा रोबो इ. गोष्टीत तिचे मन रमत नाही. हे तिला कृत्रिमच वाटत राहते अन् कार्यशाळेतील अयशस्वी सहभागी म्हणून ती कार्यशाळेतून परतते.

राज्यकर्त्यांच्या भाषणांवर सडकून टीकां करते 'गोदामं सडवणारेच दारूबंदीवर बोलतात' (गाभाच पोखरलाय फक्त) असे सूक्ष्म आकलन मांडते. माणसं, गाव, मूळ गावकी, मातीशी इमान राखणारी ही कवयित्री आहे. बळीराजाची बहुस्तरीय कहाणीच त्यांच्या कवितेचा अंतःस्वर आहे. आत्मोद्‌गार आहे.

'टिपरू' कवितेत आपल्या सभोवतालच्या शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव न मिळणे, त्यासाठी केली जाणारी आंदोलने असे चित्र डोळयांसमोर आपसुक उभे राहते.

पण आणखी शेतकऱ्यांच्या कष्टांची माळ, त्या कष्टाचा सूक्ष्म पट उभा करणारी ही कविता आपले लक्ष वेधते.

‘‘असं ऊसाचं टिपरू
मातीत दाबलं
की आंधळयाला नवे डोळे मिळावेत
तसाच उगवतो फुटव्यांचा फड
इतकी अफाट असते
त्याच्या वाढीची ओढ
की फक्त मरणाच्याच कोयत्यानं
होऊ शकते तोड’’

किंवा

‘‘आतडयाला पीळ पडला
तरी खुरंदाळली जमीन
उपसलं पाणी
कांडया कांडयात तोडला जीव
तरीसुध्दा विळयासारखं वाकलेल्यांना
ओलांडता आली नाही शीव’’[१३]

तरीही हिरवंगार वाढं पोसायचं व त्यालाच नंदनवन समजणारा शेतकरी टनाला भाव मिळेल या खोटया आशेवर जगत राहतो.

प्रसिध्द कवयित्री व समीक्षक प्रभा गणोरकर कल्पना दुधाळ यांच्या कवितेविषयी म्हणतात, ‘‘कल्पना दुधाळ यांची कविता स्वयंभू आहे. त्यांच्यापूर्वी लिहिल्या गेलेल्या कवितेचे संस्कार, प्रभाव, अनुकरण यांपासून ती सर्वथैव मुक्त आहे. काही कविता लोकगीतासारख्या आहेत, पण तोही प्रभाव नाही किंवा ते अनुकरण

नाही. संपूर्णपणे स्वतःच्या अस्सल अनुभूतीतून, उत्फूर्तपणे आलेली ही कविता. कवयित्रीची मौलिक प्रतिभा, तीव्र संवेदनक्षमता, विश्लेषक वृत्ती आणि समकालीन पर्यावरणाचा वेध घेऊन त्यावर भाष्य करणारी चिंतनशीलता या कवितेतून पारदर्शकपणे प्रतिबिंबित होते.''[१४]

शेती व शेतकऱ्यांच्या उद्ध्वस्तीकरणाबरोबरच स्त्रीच्या जगण्याचे अनेक पदर कल्पना दुधाळ यांच्या कवितेत सहजी येतात. स्त्रीला मिळणारी दुय्यमत्वाची जागा - स्थान कवयित्रीला बोचते. स्त्री व पुरूषाची एकत्व प्रतिमा स्वीकारून व कवितेतून तिला सक्षमपणे साकारणारी ही कवयित्री स्त्रीवादाच्या पुढचे पाऊल टाकते. कोणत्याही एका प्रवाहातली व प्रभावाखालची कल्पना दुधाळांची कविता वाटत नाही ती स्वतंत्र व व्यक्ती म्हणून समर्थपणे स्त्रीत्वाचा वेध घेते. निसर्गलिपी मानवी वर्तनव्यवहाराशी जोडून घेते आणि त्याचे सर्जक अर्थ आपल्याही पुढयात ठेवते. त्यामुळे आपणही एक वाचक म्हणून कुठेतरी या सृष्टीचक्राचा सक्रिय घटक बनतो. या सृष्टीचक्राशी आपण कसे अतूटपणे जोडले गेलेलो आहे तसेच एक भाग बनून राहिलेलो आहे याची सर्जनशील जाणीव कविता वाचताना अनुभवताना सतत होत राहते. हेच तर कवयित्रीचे वेगळेपण वाटते. हे वेगळेपण जपण्यासाठी कवयित्री कल्पना दुधाळ यांना त्याग करावा लागला. समर्पण द्यावे लागले आहे. पण ती एक आनंदयात्रा मानून शेतीत रमणे, शेती शिवाराबद्दलचे चिंतन करणे त्यांच्या सवयींचे बनून गेले. पिकांना दिलेल्या प्रतिमा, त्याच्याशी स्त्रीत्व जोडून घेणे व शिवाराबद्दलची सृजन ओढ या सर्व बाबी खूप बारकाव्यानिशी समोर येतात. आशय आणि अभिव्यक्तीमधील एकरूपता जगण्याशी जोडून घेणारी ही कवयित्री शेतीमातीचे ऋण मानणारी आहे. पर्यावरणाचा होत जाणारा ऱ्हास तिला दुःखी करतो. वर्तमानाशी संवाद साधता-साधता पर्यावरणाचा समतोल जपला जावा - नातेसंबंध जपले जावे स्वार्थी वृत्ती-प्रवृत्ती सोडून द्याव्यात राजकारणामुळे होणारे शोषण संपावे अशी आशा कवयित्रीला वाटते. त्यामुळे

जागतिकीकरणाचा वेध घेणारी ही कवयित्री नवीनता तर स्वीकारतेच पण परंपरेला शरण जात नाही. पर्यावरणवादी स्त्रीवाद त्यांच्या कवितेत स्पष्ट दिसतो. एक स्त्री म्हणून कष्टणारी आई, माय, आजी, शेजारीण, लेक, भूमी, माती, प्रसववेदना, गर्भांकुर, गर्भाशय इ. अनेक संदर्भ तरलपणे जपणे तिला महत्त्वाचे वाटते. कल्पना दुधाळांची कविता आधुनिक आहे. विद्रोही सूर लावणारी नाही. झाडा-झुडपांशी बोलणारी, सभोवतालच्या माणसांच्या व्यथा-वेदना नेमकेपणाने शब्दबध्द करणारी, गावाची अर्थव्यवस्था, सांस्कृतिक व्यवस्थेतली पडझड चितारते. सख्खे भाऊ वैरी होतात. म्हातारा-म्हातारी, वृध्द माणसे अडगळीला जातात याकडे ती लक्ष वेधते, आयुष्यभर उपेक्षित जीवन स्त्रीच्या वाटयाला आले तरी एकमेकींना भक्कम आधार देणारी स्त्रीच असते 'गाय आणि माय' कविता, रानभर मी, मायलेकी, दिल्याघरी, एका नाळेच्या दोन गाठी, माळावर गुरं राखताना इ. अशा कितीतरी कविता स्त्रीत्वाचा आदिम संबंध अधोरेखित करतात.

''बोरीवर लपलेल्या का ग घाबऱ्या भोरडया?
वळ लेकीचं दिसलं पाठीवरचं उघडया''

किंवा

''माझ्या घरातच पोरी  मी ग परकी झालेली
उघडयाच ओसरीत  तू बी आसऱ्याला आली?''१5

अशा समजुतीच्या व अगतिकतेच्या चार गोष्टी सांगता सांगता रीतीभातीला सामोरी जाण्याचा विचार करून जाते. कवयित्री त्याचवेळी 'रानभर मी' या कवितेत तिला सर्वत्र अस्तित्वाची जाणीव होत राहते. कवयित्री स्वतःशी बोलते, रानाशी हितगुज करते, जसे -

(१)

''डोक्यावर भारा घेऊन

(२)

''वादळाशी भांडून कमळण

जड पावलं टाकताना
रानभर माझेच आवाज
माझ्याशी बोलताना''

पानं फाटल्याची तक्रार करते
लेकच जशी माझ्यापाशी
नव्या कपडयांचा हटट् धरते.''

(३)

''हादग्याच्या फुलांची
सफेद कोयरी उलगडली
सासुरवाशीन गळयात पडून
हुसमरून रडत राहिली''[१६]

अशा उभ्या-अडव्या काकऱ्यांमध्ये कवयित्री स्वतःचा जीवन पेरा करून पुन्हा हिरवी लिपी होऊन उगवण्याची दूर्दम्य इच्छा व्यक्त करते.

'रानभर मी' (पृ.७७)

'मुरडाणं' या कवितेत कवयित्रीला रान, माती, विहीर, बांध बांधावरचा निरगुडीचा ताटवा, ताटव्यातली रानपाखरं, माचोळीवरचा विळाा, खुरपं, कुदळ खोरं प्रश्नांवर प्रश्न विचारतात की,

''शब्दांच्या लगोरी रचून
डाव मांडायचेत कशाला?
काळाच्या वहिवाटीचा
फक्त चिखलच
का तुझ्या पायाला?''[१७]

कवयित्रीने ढेकळांखाली सरकविलेली स्वप्न कधी ना कधी तरारून वर येतील अन् घाटयांसारखी तोरंबीला स्वप्न म्हणून लगडतील असा विश्वास तिला आहे. 'रोपापासून मापापर्यंत', खस्ता, कवितेला माहिती झालंय, 'पेरले नाहीत नकार आपण', एका

‘नाळेच्या दोन गाठी’, ‘कोरडा का होत नाहीस भाऊ’ या कविता ‘बाप’ माणसाच्या शेतकऱ्याच्या कष्टाची बूज राखणाऱ्या कविता असून बहुस्तरीय अनुभव प्रकट करतात.

‘परिवर्तनाच्या नावानं’ ही कविता बदलत्या ग्रामवास्तवाची नेमकी उणी, बाजू उघड करणारी कविता आहे आणि शासन, राज्यकर्ते व माहिती तंत्रज्ञानाचा आव आणून आधुनिकीकरणाचे गाणे गाणाऱ्या लोकांच्या डोळयांत झणझणीत अंजन घालणारी ही कविता आहे.

‘‘देवळाच्या भितींवर
हम दो हमारे दो च्या जागी
नेटवर्कच्या जाहिराती झळकल्या
मानंवरचं जू मोडून
ट्रॅक्टरला ट्रेलर जोडता आलं
आणि वस्ती शाळेचं नाव ऑक्सफर्ड ठेवलं
म्हणून का कुणी सुधारणांच दूत झालं?
नीट बघितलं
तर फक्त धोंडाच बदलला
झोळी तीच राहिली’’[१8]

परिवर्तनाच्या नावाने गाजर दाखविले जाते. शेतकऱ्यांचा पुळका आल्याचे दाखवून आपलीच पोळी भाजून घेणारे सत्ताधारी कवयित्रीच्या नजरेतून सुटत नाहीत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना समाज म्हणून कसे विश्लेषित करायचे? ते ‘आदिम जिद्द हरवण्याआधी’ या कवितेतून दिसते.

कल्पना दुधाळ यांच्या कवितेची जातकुळी निराळीच आहे. स्वतःच्या शेती-मातीवर नितांत प्रेम करून तिथेच जीव ओतून स्वर्ग उभारणारी ही कवयित्री निसर्गसृष्टीच्या आदिमतेशी - माहेरपण -सासरपण या सर्व भूमिकांशी स्वतःला घट्ट

बांधून घेते. हा अनुबंध कोणी लादलेला नाही तो तिने स्वतः स्वीकारलेला आहे आत्मविश्वासाने!

''शपथ असो दर उगवत्या कुडीला

दूर्दम्य इच्छाशक्तीचं वरदान लाभो''

असे पसायदान ती मागते. 'दिल्या घरी' या कवितेत कवयित्री लिहितात –

''सोनं मोडून सोयरं जोडणाऱ्या

आईची मी पोर

दानधर्म केलेल्यांची मेल्यावरही वळते मूठ

म्हणून सुपातल्या धान्यावर । पळीभर तेलावर

ओंजळभर पिठावर । विश्वास ठेवून धरली पाथ

टोचू दिले । वांग्याचे काटे भेंडीची कूस

की बोर्डवर रूळलेल्या बोटांना''[१९]

असे जगण्याशी जोडलेली ही कविता वेगळीच भासते.

''राब राब राबवतात कामं

छळ छळ छळतात शब्द

मेल्यावर अस्थींतूनही धुमतील

कविता आणि कामं''[२०]

एका नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे कष्ट, जीवन आणि कवयित्रींच्या कविता एकरूप झालेल्या आहेत. लंगडं पाखरू होऊन अंगणात भिरभिरणारी, औतकऱ्याच्या घामावर पंखांची फडफड पसरविणारी तसेच 'कुसळांच्या टोकांवर गवताचा वास जपेन मी' असे म्हणणारी कल्पना दुधाळांची काव्यप्रतिभा संवेदनांचे सूक्ष्म पदर उपलगडत नेते. तेव्हा जीवनलयीचा, नादलयीचा, गंधलयीचा, स्पर्श संवेदनेचा रूपबंधातून ध्वनीत होणारा अर्थ मनात रूतून बसतो. अशी पंचेंद्रियांना जागे ठेवणारी ही कवयित्रीची अभिव्यक्ती व

प्रतिभाशक्ती आहे. ग्रामीण व कृषी जीवनाचर वास्तव वेध घेणारी कवयित्री आहेत. डॉ. महेंद्र कदम त्यांच्या कवितेविषयी लिहितात, ''पिकांच्या प्रतिमा, त्यांच्या वाढीबरोबर खूप खोलवर जोडलं गेललं स्त्रीत्व, भूमीचं बीजारोपणं आणि सृजन एका वेगळया रूपाने आणि धाडणीने या कवितेत आलेले आहे. प्रतिमांचे जगण्याशी आलेले हे एकरूपत्व ही या कवितेची खरी ओळख आहे.''[२१] भूमीकन्या बहिणाबाई चौधरींच्या नंतर एवढया निखळ व चपखल प्रतिमाविश्व मूल्यभान असणारे आशयसूत्र उभे करणारी एक ताकदीची कवयित्री म्हणून कल्पना दुधाळ यांच्या कवितेकडे पाहावे लागते.

**संदर्भसूची :**


1- कल्पना दुधाळ, 'सिझर कर म्हणतेय माती', द्वितीय आवृत्ती, हार्मिस प्रकाशन, पुणे, २०१४ (प्रस्तावनेतून) पृ.क्र. २१

2- अरूणाढेरे (संपा.) 'स्त्रीलिखित मराठी कविता' (१95० ते २०१०), प्रथमावृत्ती, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१६, पृ.क्र. ३8७

3- तत्रैव, पृ.क्र. ३६5

4- कल्पना दुधाळ, 'सिझर कर म्हणतेय माती', द्वितीय आवृत्ती, हार्मिस प्रकाशन, पुणे, २०१४, पृ.क्र. २४

5- अरूणाढेरे (संपा.) 'स्त्रीलिखित मराठी कविता' (१95० ते २०१०), प्रथमावृत्ती, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१६, पृ.क्र. ३७३

6- तत्रैव, (१), पृ.क्र. २5

7- तत्रैव, (४), पृ.क्र. ४२

8- तत्रैव, (४), पृ.क्र. ६७

**9-** तत्रैव, (४), पृ.क्र. ३६ व ३७

**10-** कल्पना दुधाळ, 'धग असतेच आसपास', पहिली आवृत्ती, एप्रिल २०१६, लोकवाड्.मय प्रकाशन, मुंबई, पृ.क्र. १३

**11-** तत्रैव, पृ.क्र. १४ व १5

**12-** तत्रैव, पृ.क्र. २३

**13-** तत्रैव, पृ.क्र. २७

**14-** प्रभा गणोरकर, 'समकालीन कवी', महाराष्ट्र साहित्य प्रत्रिका, जुलै-सप्टेंबर २०१5, अंक क्र. ३5२, पृ.क्र. १9

**15-** कल्पना दुधाळ, 'धग असतेच आसपास', प्रथम आवृत्ती, लोकवाड्.मय प्रकाशन, मुंबई, एप्रिल २०१६, पृ.क्र. 9४, 95

**16-** तत्रैव, (१5), पृ.क्र. ७७

**17-** तत्रैव, पृ.क्र. 9० व 9१

**18-** तत्रैव, पृ.क्र. ७० व ७३

**19-** तत्रैव, पृ.क्र. ११9

**20-** तत्रैव, पृ.क्र. १२०

**21-** 'कवितारती' (संपा.) पुरूषोत्तम पाटील, (दिवाळी अंक : २०१६ सप्टें, ऑक्टोबर २०१६, नोव्हे.-डिसेंबर २०१६, वर्ष ३१वे : अंक ६, वर्ष ३२वे अं १ ला, पृ.152

- महाराष्ट्र साहित्य पत्रिका -(संपा.) महेंद्र गुंजाळ, जुलै ते सप्टेंबर २०१5, अंक क्र. ३5२ (कल्पना दुधाळ यांची मुलाखत)

- साधना (साप्ताहिक) जानेवारी २०१**8**, महाराष्ट्र फौंडेशन (अमेरिका साहित्य व समाजकार्य पुरस्कार विशेषांक २०१७) (कल्पना दुधाळ यांची मुलाखत)
- महाराष्ट्र साहित्य पत्रिका - (संपा.) डॉ. पुरूषोत्तम काळे, एप्रिल ते जून २०१६, अंक क्र. ३**55**